International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील सूक्ष्म उद्योजकांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास

**मारुती भीमराव कांबळे[1], प्रा. सुनील रामराव सालके[2]**

[1] *सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी, पुणे. १७*

[2] *सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, पुणे*

*Corresponding Author – मारुती भीमराव कांबळे*

**DOI - 10.5281/zenodo.17970891**

**घोषवारा :**

*प्रस्तुत अभ्यासात पिंपरी चिंचवड शहरातील " पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्ट्या भागातील सूक्ष्म उद्योजकांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास." केला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी पिंपरी चिंचवड शहर निवडले आहे. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे लोकांकडून झोपडपट्टी भागात राहणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. झोपडपट्ट्यातील वाढत्या लोकसंख्येमुळे तेथे नवनवीन उद्योगांना चालना मिळताना दिसून येते. पण उद्योग सुरु करताना उद्योजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जे जुने व्यावसायिक आहेत त्यांना ही आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. प्रस्तुत अभ्यासासाठी पिंपरी चिंचवड शहरातील उद्योजकांच्या प्रत्यक्षात मुलाखती द्वारे माहिती घेतली आहे. यातून असे दिसून येते की, झोपडपट्टी भागातील उद्योजकांमध्ये आर्थिक नियोजानाचा अभाव, शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव, जागेचा अभाव, बाजाराच्या माहितीचा अभाव, तसेच सरकारकडून त्यांना माहिती पुरवली जात नाही. झोपडपट्ट्यातील लोकांमध्ये असणारी व्यसनधीनता, अस्वच्छता, उद्योगाचे अव्यवस्थापन, बाजारपेठेची माहिती न घेणे, शासकीय योजनांची माहिती न घेणे अश्या अनेक कारणांनी झोपडपट्ट्यातील उद्योजकांच्या आर्थिक सामाजिक अडचणीत वाढ होत आहे. म्हणून अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.*

**प्रस्तावना :**

भारतातील वाढत्या लोकसंख्ये मुळे ग्रामीण भागातून लोकांचे स्थलांतरण होत आहे. लोकांच्या वाढत्या स्थलांतरामुळे शहरीकरणवाढत आहे. वाढत्या शहरी कारणामुळे लोकांच्या राहण्याच्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात स्थलांतरीत लोकांकडून शासकीय जागा, रेल्वेची जागा, डोगर भागात तसेच नदीच्या परिसरात राहत असल्याने ते तेथेच झोपडपट्टी करून राहतात. या लोकांच्या रोजगाराच्या समस्या निर्माण झाल्यामुळे ते अत्यंत कठीण परिस्थिती किंवा प्रतिकूल परिस्थिती ही आपला व्यवसाय सुरू करतात. या व्यक्तींना व्यवसाय सुरू करण्यासाठी अनेक अडचणींना सामोर्य जावे लागते. त्यामध्ये भांडवल, बाजारपेठ, अपुऱ्या पायाभूत सुविधा, लोकांच्या असणाऱ्या बघण्याचा दृष्टिकोन अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते तरी ती उद्योजकांकडून परिश्रम चिकाटी आणि कौशल्याच्या जोरावर ते टिकून असतात त्यामुळे त्या उद्योजकांना शासकीय आणि निम

शासकीय आर्थिक तसेच विविध योजनांच्या माहितीच्या अभावामुळे त्यामुळे झोपडपट्ट्यातील उद्योजकांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड शहरातही वाढत्या औद्योगीकरणा मुळे लोकांचे स्थलांतर झाल्यामुळे झोपडपट्टीतील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील उद्योजकांचा अभ्यास केला आहे.

**अभ्यासाचे महत्व :**

प्रस्तुत अभ्यासामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील विविध झोपडपट्ट्यातील व्यवसायिकांचा अभ्यास केला आहे. उद्योजकांचे आर्थिक योगदान स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये आहे. त्यामध्ये रोजगार निर्मिती, सामाजिक योगदान, गरिबी कमी करण्यासाठीचे योगदान अशा अनेक योगदानामुळे झोपडपट्टीतील व्यवसायिकांचा अभ्यास महत्वाचा आहे.

**अभ्यासाचे उद्देश :**

पिंपरी चिंचवड शहरांमध्ये १७ लाख २९ हजार ३२० लोकसंख्या आहे. शहरातील झोपडपट्टी भागात १ लाख ४७ हजार ८१० लोकसंख्या आहे. शहरात घोषित आणि अघोषित झोपडपट्ट्या आहेत. यामध्ये असणाऱ्या विविध उद्योजकांची भूमिका, कार्य, अडचणी समस्या अशा अनेक कारणांसाठी या अभ्यासाचा उद्देश प्राप्त होतो. झोपडपट्टी भागातील उद्योगांचे आर्थिक योगदान, सामाजिक उन्नती, गरिबी निवारण अश्या विविध योगादान समजण्यासाठी या विषयाचा अभ्यास केला आहे. तसेच लोकांमध्ये शासकीय व अशासकीय मदतीचा उपयोगाचा अभ्यास केला आहे.

**वैशिष्ट्य:**

१. पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील उद्योजकांचा अभ्यास करणे.

२. पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे .

**गृहीतक:**

१) उद्योजकांकडून शासकीय आणि निमशासकीय योजनांचा आर्थिक लाभ घेतला जात नाही

**संशोधन पद्धत:**

प्रस्तुत अभ्यासासाठी "पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्ट्या भागातील सूक्ष्म उद्योजकांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास." अभ्यास केला आहे.

**प्राथमिक** – प्रस्तुत अभ्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्ट्या भागातील सूक्ष्म उद्योजकांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास. करण्यासाठी शहरातील वेगवेगळया उद्योजकांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे.

**दुय्यम** – प्रस्तुत अभ्यासाठी वेबसाईट, इंटरनेट शोधनिबंध इत्यादीद्वारे माहिती घेतली आहे.

**अभ्यासाचे क्षेत्र:**

प्रस्तुत अभ्यासासाठी पिंपरी चिंचवड शहराची निवड केली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागातील झोपडपट्ट्यातील उद्योजकांकडून माहिती घेतली आहे. या अभ्यासाठी शहरातील विविध झोपडपट्ट्यातील उद्योगांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास केला आहे.

**साहित्याचे पुनरावलोकन:**

**१) प्रवीण कुमार बी. (२०१५) :** यांनी "सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातील आव्हाने आणि पुढे जाण्याचा मार्ग" या विषयावर अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांनी उद्योगातील नवकल्पना, सर्जनशीलता आणि उद्योगाच्या समस्यांचा अभ्यास केला आहे. जगातील मंदी आणि देशांतर्गत मंदी असून ही देशातील उद्योगातील गती कायम आहे. उदारीकरणामुळे देशातील व्यापार वाढीस लागला आहे. तसेच देशातील रोजगारात ही वाढ झाली आहे. सूक्ष्म, लघु, आणि मध्यम उद्योगांनी उच्च विकास दर नोंदविला आहे. उद्योगांच्या उत्पन्नाच्या वाढीमुळे रोजगार आणि निर्यातीतील वाढीमुळे गीडीपीत वाढ झाली आहे. प्रस्तुत अभ्यासात सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्राला बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून खूप मोठ्या प्रमाणत स्पर्धेला सामोर्य जावे लागते. तसेच अभ्यासातून असे सुचवण्यात आले की, देशातील उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञानासह वित्तपुरवठा दिला गेला पाहिजे.

**२) बलदेव बी. काकडे आणि तुषार चौधरी (२००८) :** यांनी सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी भंडारा जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा अभ्यास केला आहे. भंडारा जिल्ह्यात सूक्ष्म उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचा शोध घेऊन त्याच्या अभ्यास केला आहे.संशोधकाने एकूण १७५ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगापैकी प्रत्येक तालुक्यातून २५ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग निवडले आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी माहिती चे विश्लेषण वर्णनात्मक आकडेवारी वापरून माहिती घेतली आहे.

**प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास:**

प्रस्तुत संशोधनासाठी पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्ट्यातील विविध भागातील ९८ उद्योजकांचा अभ्यास खालील प्रमाणे केला आहे.

| अ.क्र. | प्रश्नावली | उत्तरे | वारंवारिता (९८) | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | उद्योजकाचे पूर्ण नाव | | | |
| २ | मोबाईल नं. | | | |
| ३ | वय | १८ ते २५ | २२ | २२.४४% |
| | | २६ ते ४० | ५८ | ५८.५८% |
| | | ४१ ते ५९ | १६ | १६.३२% |
| | | ६० पेक्षा जास्त | ०२ | २.६६% |
| ४ | लिंग | पुरुष | ५० | ५१.००% |
| | | महिला | ४८ | ४९.००% |
| | | इतर | ०० | ००% |
| ५ | शैक्षणिक पात्रता | प्राथमिक | ४१ | ४१.८४% |
| | | माध्यमिक | २४ | २४.४९% |
| | | उच्च माध्यामि | २५ | २५.५१% |
| | | पदवी | ०६ | ६.१२% |
| | | पदविउत्तर | ०२ | २.४% |
| ६ | राहण्याचे ठिकाण (झोपडपट्टीचे नाव/क्षेत्र) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | आपण कोणता व्यवसाय/उद्योग चालवता? | | | |
| ८ | हा उद्योग आपण किती वर्षांपासून करत आहात? | १ ते २ | २० | २०.४१% |
| | | २ ते ४ | ३६ | ३६.७४% |
| | | ४ ते ५ | १२ | १२.२५% |
| | | ५ वर्षा पेक्षा जास्त | ३० | ३०.६०% |
| ९ | उद्योग सुरू करण्याचे मुख्य कारण काय होते? | उपजीविका | ४१ | ४१.८४% |
| | | बेरोजगारी | १८ | १८.३६% |
| | | कुटुंबाचा व्यवसाय | ३८ | ३८.७६% |
| | | इतर | १ | १.४% |
| १० | उद्योगासाठी सुरुवातीचे भांडवल कोठून मिळवले? | स्वतःची बचत | ६६ | ६७.३५% |
| | | मित्र/नातेवाईक | ११ | ११.२२% |
| | | बँक कर्ज | १० | १०.२०% |
| | | स्वयं-सहायता गट / मायक्रोफायनान्स | ६ | ६.१२% |
| | | इतर | ५ | ५.१०% |
| ११ | सध्या आपल्या उद्योगात किती कामगार आहेत? | १ | ५३ | ५४% |
| | | २ | २७ | २७.५५% |
| | | ३ | ९ | ९.१८% |
| | | ४ पेक्षा जास्त | ४ | ४.१% |
| १२ | उद्योगातून मासिक उत्पन्न अंदाजे किती मिळते | ५,००० पेक्षा कमी | ३४ | ३४.६९% |
| | | ५००० ते १०,००० | १२ | १२.२४% |
| | | १०,००० – २०,००० | ३६ | ३६.७३% |
| | | २०,००० पेक्षा जास्त | १६ | १६.३२ % |
| १३ | उद्योग करताना सर्वात मोठी अडचण कोणती आहे? | भांडवलाची कमतरता | २८ | २८.५७% |
| | | बाजारपेठेत स्पर्धा | २७ | २७.५५% |
| | | कायदेशीर/परवानगी समस्या | १४ | १४.२८% |
| | | जागा व पायाभूत सुविधा | २७ | २७.५५% |
| | | इतर | ०२ | २.५% |
| १४ | सरकारी योजना किंवा मदत यांचा लाभ घेतला आहे का? | होय | १३ | १३.२७ % |
| | | नाही | ८५ | ८६.७३% |
| १५ | असल्यास कोणत्या योजना? | | | |
| १६ | आपल्या उद्योगाच्या वाढीसाठी कोणती मदत सर्वात जास्त उपयोगी ठरेल असे आपल्याला वाटते? | कमी व्याजाचे कर्ज | २९ | २९.५९% |
| | | प्रशिक्षण / कौशल्यविकास | १७ | १७.३५% |
| | | बाजारपेठ उपलब्ध करून देणे | २७ | २७.५५% |
| | | पायाभूत सुविधा | २५ | २५.५१% |
| १७ | तुम्ही शासकीय आणि निम शासकीय आर्थिक लाभ (कर्ज) घेतले आहे का? | होय | १७ | १७.३४% |
| | | नाही | ८१ | ८२.६५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | तुम्ही कोणत्या शासकीय निधीचा लाभ घेतला आहे का? | प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) | ०६ | ६.१२% |
| | | प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) | ०० | ००% |
| | | राष्ट्रीय शहरी आजीविका अभियान (NULM) | ०० | ००% |
| | | स्टार्टअप इंडिया / स्टँडअप इंडिया योजना | ०३ | ३.१% |
| | | महिला आर्थिक विकास महामंडळ (MAHAVED, महाराष्ट्र | ०३ | ३.१% |
| | | वरील पैकी कोणत्याही नाही | ८६ | ८७.७६% |
| १९ | तुम्ही कोणत्या निमशासकीय निधीचा लाभ घेतला आहे का? | स्वयंसेवी संस्था (NGOs) | ०४ | ४.१% |
| | | मायक्रोफायनान्स संस्था (Microfinance Institutions – MFIs) | ०२ | २.३% |
| | | स्वयं-सहायता गट (SHG) व सहकारी संस्था | ०८ | ८.१६% |
| | | कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) निधी | ०० | ००% |
| | | वरील पैकी कोणत्याही नाही | ८४ | ८५.७१% |
| २० | तुमच्या सूचना | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून आले आहे की, पिंपरी चिंचवड शहरातील उद्योजकतेत **तरुण-मध्यमवयीन गटातील व्यावसायिक आहेत.** उत्पादकता आणि जोखीम घेण्याची मानसिकता सर्वाधिक या वयोगटात आढळते. पिंपरी चिंचवड शहरील झोपडपट्टी भागातील उद्योजकतेत **पुरुष–महिला सहभाग जवळजवळ समान** आहे. झोपडपट्टी किंवा शहरी गरीब वस्तीत महिलांची उद्योजकता वाढत असल्याचे दिसून येते. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, बहुतांश उद्योजक **प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतले**ले आहेत.

वरील तक्त्यावरून असे दिसून आले आहे की, **औपचारिक शिक्षणापेक्षा गरज, अनुभव आणि कौशल्ये** यामुळे उद्योजकता निर्माण होत आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील ६७% उद्योजक २ वर्षांपेक्षा जास्त कालावधी पासून व्यवसायात आहेत. म्हणजेच शहरातील उद्योगातील स्थिरता आणि सातत्य चांगले आहे.

लोकांकडून मुख्यत्वे **उपजीविका आणि कुटुंबाचा व्यवसाय पुढे नेण्यासाठी उद्योग सुरू करतात.** तसेच बेरोजगारी हा देखील महत्त्वाचा घटक आहे. अत्यंत जास्त व्याव्सायांकडून **स्वतःच्या बचतीवर अवलंबून** आहेत. बँक कर्ज आणि सरकारी योजनेद्वारे

भांडवल मिळण्याचे प्रमाण खूपच कमी. बहुसंख्य व्यवसाय सूक्ष्म उद्योजक (micro enterprise) स्वरूपाचे आहेत आणि एकट्या व्यक्तीवर चालतात. सुमारे **४७% उद्योजकांचे उत्पन्न १०,००० पेक्षा कमी आहे,** म्हणजे आर्थिक स्थिरतेची कमतरता आहे.

**पिंपरी चिंचवड शहरातील झोपद्पात्त्यातील व्यवसायिकांना भांडवल, बाजारातील स्पर्धा आणि जागेची समस्या** मुख्य अडथळे आहेत. त्यामुळे त्यांना उद्योग वाढवताना **स्थिर जागा आणि निधी मिळवणे** कठीण जात आहे. पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील व्यवसायिकांना मोठ्या प्रमाणात **सरकारी योजनांची माहिती, लाभ घेण्याची प्रक्रियेची अडचण** आहेत. झोपडपट्ट्यातील **८०% पेक्षा जास्त उद्योजकांना सरकारी योजनाचा कोणताही निधी मिळालेला नाही.**

## निष्कर्ष :

पिंपरी चिंचवड शहरातील विविध झोपडपट्ट्यातील उद्योजकांची माहिती प्रश्नावली द्वारे माहिती घेऊन अभ्यास केला असता. असे दिसून आले आहे की, पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील **२६–४० वयोगटातील व्यवसायिक आहेत आणि त्यात सर्वात जास्त** महिलांचा सहभाग आहे. व्यावसायिकाची **शैक्षणिक पातळी कमी असली तरी उद्योजकता विषयक ज्ञान आणि माहित त्यांना आहे,** यावरून कौशल्याधारित व्यवसाय झोपडपट्टी भागात ही केला जातो. झोपडपट्टी भागातील व्यवसायिकांना **स्वतःचे भांडवलच मुख्य स्त्रोत** आहे. त्यांच्या कडून बँक अथवा सरकारी लाभ पोहोचत नाहीत. झोपडपट्टीतील व्यवसाय लहान स्वरूपाचे असून **एकट्याच व्यक्तीवर अवलंबून चालतात**. पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टी भागातील व्यावसायिकांच्या प्रामुख्याने भांडवल, बाजारातील स्पर्धा आणि जागेची कमतरता प्रमुक समस्या आहेत.

## शिफारशी:

१) MSME व सरकारी योजनांची माहिती झोपडपट्ट्यातील उद्योजकांपर्यंत पोहोचवावी.
२) झोपडपट्ट्यातील व्यासायीकांना वित्तीय साक्षरता व डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण वाढवावे.
३) झोपडपट्ट्यातील महिला उद्योजकांसाठी स्वतंत्र आर्थिक पॅकेज व सबसिडी असावी.
४) शासकीय संस्थांनी व्यवसाय सुरु करण्यासाठी Single-window system विकसित करावे.
५) कच्चामाल पुरवठा साखळी (Supply Chain) मजबूत करणे आवश्यक.
६) स्टार्टअप-MSME क्षेत्रासाठी स्थानिक बिझनेस इन्क्युबेशन सेंटर स्थापन करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :

१) https://pcmcindia.gov.in
२) https://mudra.org.in
३) World Bank Urban Livelihood Studies
४) **कुमार, प्रवीण बी. (2015).** *सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातील आव्हाने आणि पुढे जाण्याचा मार्ग.* भारत: MSME संबंधित संशोधन निबंध.
५) **काकडे, बलदेव बी., & चौधरी, तुषार. (2008).** *सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास – भंडारा जिल्हा एक विशेष संदर्भ.* महाराष्ट्र: शोधनिबंध.
६) https://msme.gov.in
७) https://nulm.gov.in